http://www.epitomejournals.com Vol. 4, Issue 5, May 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# 'अस्वस्थ नायक' बेकारीची तर 'बुद्धाचा ऱ्हाट' जात वास्तवाची व्यथा मांडणारी कादंबरी



**- मा. मा. जाधव**
मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत,
जि. हिंगोली

## ABSTRACT

उत्तम कांबळे यांची 'अस्वस्थ नायक' ही कादंबरी बेकारीचे वास्तव अधोरेखित करणारी आहे. याचबरोबर बेकारांच्या मनोव्यवस्थेचे चित्रण या कादंबरीतून आले आहे. 'अस्वस्थ नायक' ही कादंबरी पुष्प प्रकाशनने इ.स.2000 मध्ये प्रकाशित केली. या कादंबरीची पाचवी आवृत्ती मनोविकास प्रकाशनाने डिसेंबर 2015 मध्ये प्रसिद्ध केली. समकालीन भारतीय समाजातील अतिशय कळीचा असणारा बेरोजगारीचा प्रश्न या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR All rights reserved.